**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक १ यांचा उलटतपास प्रतिवादीतर्फे वकिल श्री. बी.जी. खोब्रागडे यांच्याद्वारे –**

९. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि प्रतिवादीचे मूळगाव एकच आहे. दावा मिळकतीचे खसरा नं. मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याची सत्यप्रत **निशाणी क्र. १६** वर दाखल केली आहे. मला वाचता येत नाही. आता मला **निशाणी क्र. २२** वरील यादी सोबत दाखल केलेला ७/१२ उता–यातील मजकूर वाचून दाखवण्यात आला. सदर उता–यातील मजकूर **निशाणी क्र. १६** वरील उता–यातील मजकूरा सारखाच आहे. सदर ७/१२ उता–याला **निशाणी क्र. २३** देण्यात येत आहे. प्रतिवादींचा ताबा दावा मिळकतीवर कमीतकमी १०–१५ वर्षापासून आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या निशाणी क्र. १२ वरील शपथ पत्रावरील मजकूर इंग्रजीत असल्यामुळे मला वाचता येत नाही. (न्यायालयाने विचारल्यावर साक्षदाराने सांगितले की, त्याच्या वकिलांनी सदर शपथपत्रातील मजकूर त्याला समजावून सांगितले होते.) हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वकिलांनी माझ्या शपथ पत्रात दावा मिळकतीवर १९९६ पासून प्रतिवादींचा ताबा आहे असे नमूद केल्याबद्दल मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मागील ३० वर्षापासून प्रतिवादींचा वाद मिळकतीवर ताबा आहे. सदर ताबा प्रतिवादींना देण्याकरिता आमचा प्रतिवादींसोबत कोणताच करारनामा झाला नाही.

प्रश्न – जर तुम्ही करारनामा केला नाही तर दावा मिळकत प्रतिवादींच्या ताब्यात असण्याचे कारण काय?

उत्तर – आम्ही दावा मिळकत प्रतिवादींना चराइने दिली होती. त्यानंतर त्यांनी बेइमानी केली आणि आमची मिळकत आम्हाला परत केली नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी माझ्या आणि इतर वादींच्या विरोधात दिवाणी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि इतर वादींचे प्रतिवादींसोबत काहीतरी व्यवहार झाल्यामुळेच त्यांनी आमच्या विरोधात दिवाणी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आमचा प्रतिवादींसोबत दावा मिळकत विक्रीबद्दल करारनामा झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीच्या मोबदल्याची पूर्ण रक्कम आम्ही प्रतिवादींकडनं घेतलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत प्रकरणा व्यतिरिकत

दावा मिळकतीचा ताबा घेण्याकरिता प्रतिवादींच्या विरोधात कोणतीच केस दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १६ व २३ वरील ७/१२ उता–यातील सर्व भोगवटदारांनी मिळून प्रस्तुत दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींच्या विरोधात खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत समक्ष

मौदा.

दिनांक २०.१२.२०२४ (ए.बी. कादियन )

दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर,

मौदा